# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४३/२००७/ दिनांक :

<table>
<tr><td>१)</td><td>श्री. इरगोंडा लक्ष्मण गोंधळी,<br>वॉर्ड नं.२५, घर नं.२३३/२,<br>सिटी सर्व्हे नं. १८९२५,<br>शहापूर, इचलकरंजी,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.</td><td>अपेलंट</td></tr>
<tr><td></td><td>विरूध्द</td><td></td></tr>
<tr><td>१)</td><td>कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,<br>कोल्हापूर.</td><td rowspan="3">विरूध्द पक्षकार</td></tr>
<tr><td>२)</td><td>कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>संवसु शहर उपविभाग "ब",<br>इचलकरंजी, जि.कोल्हापूर.</td></tr>
<tr><td>३)</td><td>उपकार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु शहर उपविभाग "ब"<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे</td></tr>
</table>

**कोरम :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. इरगोंडा लक्ष्मण गोधळी, रा. वॉर्ड नं. २५, घर नं. २३३/२, सिटी सर्व्हे नं. १८९२५, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी पॉवर लुमसाठी १४ अश्वशक्ती थ्री फे ज कनेक्शन मिळणेसाठी दि. २१–३–०७ रोजी मागणी अर्ज केला आहे. योग्य कालावधीत वि.प. ने वीज पुरवठा केला नाही म्हणून श्री. गोंधळी यांनीं तक्रार केली असल्याचे दिसून येते.

सदर अर्जदार श्री. गोंधळी यांनी मागणी अर्ज सादर केल्यावर श्री. कुलकर्णी, शाखाधिकारी, शहापूर यांचेकडे वारंवार पाठपुरावा करूनही जोडणी न दिल्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे “क्ष“ फ ॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. क्र. ९७३१ दि. २६–१०–०७ च्या आदेशाने खर्चासंबंधीचे अंदाजपत्रक त्वरित करून द्यावे. तसेच उपलब्ध स्कीममधून शक्य तितक्या लवकर कनेक्शन द्यावे असे कक्षाने कळविले. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री. गोंधळी यांनी कोल्हापूर परिमंडल स्थित ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे “अ“ नमुन्या तक्रार केली आहे. त्या संदर्भात दि. ८–१–०८ रोजी सुनावणीच्या दरम्यान त्वरित कनेक्शन द्यावे, सप्लाय कोड प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी व झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई द्यावी अशी मागणी केली.

श्री. गोंधळी यांनी मागणी केलेल्या ठिकाणच्या रोहित्रावर भार शिल्लक नसल्याचे ग्राहकास तोंडी सांतिल्याचे वि.प.नी नमूद केले आहे. तसेच सध्या वि.प. यांचेकडे कोणतीही योजना (स्कीम) मंजूर नसलेने वीज पुरवठा देणे अशक्य असल्याचे नमूद केले आहे. ग्राहकाने तक्रार केल्यावर अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशानंतर म्हणजे दि. २४–१०–०७ नंतर कनिष्ठ अभियंता, शाखा शहापूर यांनी अंदाजपत्रक तयार करून नकाशासह मंजुरीस पाठविले. सुनावणीच्या दरम्यान कार्यकारी अभियंता यांनी जादा अश्वशक्तीच्या रोहित्रास मंजुरी मिळाल्याने नजिकच्या काळात जोडणी देणे शक्य असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणाची सुनावणी दि. ८–१–२००८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संवसु विभाग इचलकरंजी येथे ११.४५ ते १२.४५ या वेळेत झाली. त्यावेळी स्वत: तक्रारदार इरगोंडा लक्ष्मण गोंधळी, विरूध्द पक्षा तर्फे श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, विभाग इचलकरंजी, श्री. माने, उपकार्यकारी अभियंता, शहर “ब“ उपविभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, शाखा शहापूर हे उपस्थित होते.

श्री. गोंधळी व वि.प. यांनी सादर केलेली कागदपत्रे, कथने यांचा विचार करता मंच खालील प्रमाणे निष्कर्षाप्रत आला आहे.

श्री. गोंधळी यांनी दि. २१–३–०७ रोजी रितसर अर्ज केल्याचे दिसून येते. तथापि मागणीच्या ठिकाणी भार शिल्लक नसल्याने नवीन रोहित्रास मंजुरी मिळेपर्यंत कनेक्शन जोडणी देता येणार नसल्याचे श्री. कुलकर्णी, शाखा शहापूर यांनी तोंडी सांगितल्याचे श्री. गोंधळी यांनी मान्य केले आहे. श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांनी वरीष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा केला आहे पण सर्वच स्तरावर स्कीम मंजुर नसल्याने वीज पुरवठा करता येणार नाही असे “छापील नमुन्यातील उत्तर“ दिल्याचे दिसून येते. भार शिल्लक आहे किंवा कसे याबद्‌दल अर्जदारास लेखी कळविणे, ग्राहकाने करावयाच्या खर्चासंबंधी कळविणे याहीपेक्षा अर्ज केलेल्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत जागेची तपासणी करून वरीष्ठ कार्यालयास व ग्राहकास कळविल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतूद ४.३.२ चा भंग केल्याचे दिसून येते. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील ४.३ तसेच ४.४ चा भंग केला असल्याने वि.प. हे दंडात्मक कारवाईस पात्र ठरतात.

कोणतीही स्कीम नाही, मटेरिअल नाही या सबबी वि.प. ने सांगितल्या परंतू त्या वि.प. च्या वरीष्ठ कार्यालयातून पूर्तता होणे आवशक्य आहे. ग्राहकाने मागितलेली नुकसान भरपाई कशी काय ? याचा लेखी मेळ ग्राहकाने दिला नसल्याने ग्राहकाची मागणी फेटाळण्यात येत आहे. सुनावणीच्या दरम्यान नोडल ऑफीसर, मंडल कार्यालय कोल्हापूर यांची गैरहजेरी नोंद करावी लागत आहे. ते उपस्थित असते तर तक्रारदाराचा प्रश्न जलद गतीने मार्गी लागण्यास मदत होणार होती पण तसे झाले नाही. त्याचप्रमाणे सुनावणीच्यावेळी अधिकारी वर्गानी युनिफॉर्म व नेमप्लेट लावूनच उपस्थित होणे योग्य आहे असे मंचाचे मत आहे. मागणीच्या ठिकाणी रोहित्राच्या ऐवजी जादा अश्वशक्तीचे रोहित्र बसविणेचे कामी त्वरित कार्यवाही अपेक्षित आहे.

सर्व कागदपत्रे, सुनावणी दरम्यानची कथने याचा विचार करून मंच खालील प्रमाणे आदेश परीत करीत आहे.

## आदेश

१) श्री. गोंधळी यांच्या मागणी अर्जाच्या जागेची पाहणी व अहवाल अर्ज दिनांक २१–३–०७ पासून ७ दिवसांचे आंत न दिल्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील ४.३ च्या तरतूदीचा भंग केला असल्यामुळे संबंधित वि.प. हे दंडात्मक कारवाईस पात्र आहेत.

२) विनियमातील तरतुदीनुसार दि. २१–३–०७ या अर्जाच्या तारखेपासून ७ दिवसांत म्हणजेच दि. २८–३–०७ पर्यंतच्या कालावधीनंतर आदेशाच्या म्हणजेच दि. २८–१–२००८ तारखेपर्यंत रू. १००/– विलंबाच्या प्रती आठवड्यास किंवा त्याच्या भागास (४४ आठवडे x रू.१००/– प्रती आठवडा) श्री. गोंधळी यांना देणेत यावेत.

३) श्री. गोंधळी यांच्या अर्जाची पूर्तता झालेनंतर (४.२ नवीन सुधारणेसह) ९० दिवसांचे आंत जोडणी देणेची आहे.

४) सदरची दंडात्मक रक्कम नवीन भरावयाच्या रक्कमेतून वजावट देण्यात यावी व तसे ग्राहकास समजावून सांगावे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केलेचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( एस.आर बांबळे )
सदस्य–सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

श्री. इरगोंडा लक्ष्मण गोधळी, रा. वॉर्ड नं. २५, घर नं. २३३/२, सिटी सर्व्हे नं. १८९२५, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी हातगाम यंत्र (पॉवर लुम) चे १४ अश्वशक्ती थ्री फेज कनेक्शन करिता वीज पुरवठा मिळावा म्हणून वितरण कंपनीकडे अर्ज केला आहे व अद्याप वीज पुरवठा मिळालेला नाही. याबाबत तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हपूर येथे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. २५–१०–२००७ चे पत्राने निर्णय दिला आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी दि. ८–१–२००८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संवसु विभाग इचलकरंजी येथे ११.४५ ते १२.४५ या वेळेत झाली. त्यावेळी स्वत: तक्रारदार इरगोंडा लक्ष्मण गोंधळी, विरूध्द पक्षा तर्फे श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, विभाग इचलकरंजी, श्री. माने, उपकार्यकारी अभियंता, शहर "ब" उपविभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, शाखा शहापूर हे उपस्थित होते.

अपीलदाराचे तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप व म्हणणे खालील प्रमाणे असलेचे दिसून येते –

श्री. इरगोंडा लक्ष्मण गोधळी, रा. वॉर्ड नं. २५, घर नं. २३३/२, सिटी सर्व्हे नं. १८९२५, योगाश्रमामागे शहापूर, इचलकरंजी यांनी त्या ठिकाणी १४ अश्वशक्ती हातमाग यंत्र (पॉवर लुम) कनेक्शनला नवीन वीज पुरवठा मिळणेसाठी दि. २१–३–२००७ रोजी अर्ज दाखल केला आहे. लोड शिल्लक नाही असे तोंडी सांगितले. अद्याप पुढील कार्यवाही झालेली नाही. सबब कनेक्शनला वीज पुरवठा मिळावा व कार्यवाहीस विलंब झालेमुळे नुकसान भरपाई मिळावी.

विरूध्द पक्षाचे वतीने सांगणेत आले कि, तक्रारदार यांनी सदर ठिकाणी १४ अश्वशक्ती हातगाम यंच (पॉवर लुम) साठी वीज कनेक्शन मिळावे यासाठी दि. २१–३–२००७ ला कागदपत्रांसह अर्ज दाखल केला आहे. नजीकचे रोहित्रावर कनेक्शन देणेकरिता भार शिल्लक नाही, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे प्रकरणावर विचार होताना कनेक्शन देणेसाठी मार्ग काढणेत आलेचे म्हणजे नजीकचे दोन रोहित्र केंद्राची क्षमता वाढविण्याचे प्रकरण मंजूर केलेचे व किमान क्षमता वाढविणेस एक रोहित्र उपलब्ध झालेस कनेक्शन देणेची कार्यवाही केली जाईल असे सांगण्यात आले.

सर्व कागदपत्रे, तक्रारदार व वि.प. यांनी केलेले कथन यांचा एकत्रित विचार करता मंचाच्या निदर्शनास खालील बाबी आल्या.

१) तक्रारदार यांचे नुकसान झालेचा मुद्‌दा स्पष्ट व ग्राह्य नसलेने त्यांचे नुकसान भरपाईची मागणी फेटाळून लावणेत येत आहे.

# आदेश

७) तक्रारदार श्री. इरगोंडा लक्ष्मण गोंधळी यांनी वीज कनेक्शनसाठी आवश्यक पूर्तता केली असलेने वि.प. यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी हातमाग यंत्र कनेक्शनला दि. ३१–३–२००८ पर्यंत वीज पुरवठा करावा.

८) सदर आदेशाची अंमलबजावणी केलेचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

९) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

| | |
|---|---|
| ( जी. सी. लेले ) | ( एस.आर बांबळे ) |
| सदस्य | सदस्य–सचिव |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |